ePaper

**बायकोसाठी घरातील सोनं विकून घेतला ‘आयफोन 18 प्रो’**



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 19 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 2 वरुन...

हिंजवडी आयटी पार्कसाठी ‘अ‍ॅक्शन प्लॅन’!

## ममता गटाला ‘फुटबॉलपटू’, तर अरुप रॉय गटाला ‘लिफाफा’ चिन्ह

# TMC चा ‘फूल-गवत’ इतिहास संपला!

महाईन्यूज | पश्चिम बंगाल

**निवडणूक आयोगाने तृणमूल काँग्रेस पक्षाचे नाव आणि या पक्षाचं चिन्ह दोन्ही गोठवलं. ममता बॅनर्जी आणि ऋतब्रत बॅनर्जी या दोन्ही गटांनी येत्या विधानसभेच्या पोटनिवडणुकीत तृणमूल काँग्रेस हे नाव आणि पक्षचिन्ह वापरू नये असंही निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. यानंतर आता निवडणूक आयोगाने ‘ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस’ हे नाव आणि ‘फुटबॉलपटू’ हे चिन्ह देण्यात आले आहे. तर, अरुप रॉय यांच्या गटाला ‘डेमोक्रॅटिक तृणमूल काँग्रेस’ असे नाव देऊन ‘लिफाफा’ चिन्ह दिले आहे.**

ममता बॅनर्जी आणि ऋतब्रत बॅनर्जी या दोन्ही गटांना विधानसभेच्या पोटनिवडणुकीत तृणमूल काँग्रेस हे नाव आणि पक्षचिन्ह दोन्ही वापरता येणार नसल्याचे स्पष्ट केल्यानंतर नवं नाव आणि चिन्ह निवडण्यासाठी शुक्रवारपर्यंतची मुदत दिली होती. दोन्ही गटांनी आयोगाकडे पक्षाची नावे आणि चिन्ह याचे पर्याय सादर केले होते. त्यानुसार आज आयोगाने एका आदेशाद्वारे ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसला पश्चिम बंगाल, मेघालय आणि त्रिपुरा या राज्यांमध्ये ‘ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस’ हे नाव आणि ‘फुटबॉलपटू’ हे चिन्ह दिले आहे.

आयोगाच्या आदेशानुसार, याचिकाकर्ते अरुप रॉय आणि ममता बॅनर्जी यांना ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस हे नाव आणि पक्षाचे चिन्ह फूल आणि गवत हे वापरता येणार नाही. याबाबतचा आदेश १७ सप्टेंबर २०२६ रोजी काढण्यात आला आहे. दरम्यान, निवडणूक आयोगाने दोन्ही गटांना पक्षाच्या नावासाठी तीन आणि चिन्हासाठी तीन पर्याय सुचवण्यास सांगितले होते. यानुसार आयोगाने अरुप रॉय यांच्या नेतृत्वाखालील गटाला डेमोक्रॅटिक तृणमूल काँग्रेस असे नाव आणि लिफाफा हे देण्यात आल्याचे आदेशात म्हटले आहे.



### निवडणूक आयोग नाव-चिन्ह का गोठवतो?

गुरुवारी दिलेल्या अंतरिम आदेशात निवडणूक आयोगाने म्हटलं की, ऑल इंडिया तृणमूल काँग्रेसमध्ये दोन प्रतिस्पर्धी गट असल्याचं आयोगाच्या निदर्शनास आलं आहे. त्यामुळे या वादावर निवडणूक चिन्ह (आरक्षण आणि वाटप) आदेश, १९६८ मधील परिच्छेद १५ अंतर्गत सविस्तर निर्णय घेणं आवश्यक असल्याचं आयोगाने स्पष्ट केलं. राजकीय पक्षांमध्ये फूट पडण्याची ही पहिलीच वेळ नाही. अलीकडच्या काळात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (NCP) यांच्यातही पक्षाचे नाव आणि चिन्हावरुन वाद झाला होता. ही दोन्ही प्रकरणं सध्या न्यायप्रविष्ट आहेत. शिवसेना प्रकरणात निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या गटाला पक्षाचं अधिकृत नाव आणि ‘धनुष्यबाण’ हे चिन्ह दिलं. राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रकरणात अजित पवार यांच्या गटाला पक्षाचं मूळ नाव आणि ‘घड्याळ’ हे चिन्ह मिळालं. मात्र, दोन्ही प्रकरणांमध्ये आयोगाची प्रक्रिया सारखी नव्हती. शिवसेना प्रकरणात अंतिम निर्णय घेण्यापूर्वी आयोगाने पक्षाचं नाव आणि चिन्ह गोठवलं होतं. तर राष्ट्रवादीच्या प्रकरणात आयोगाने थेट अंतिम निर्णय देत अजित पवार यांच्या गटाला मूळ नाव आणि चिन्ह दिलं. त्यामुळे तृणमूलच्या वादात आयोगाने आधी नाव आणि चिन्ह का गोठवलं आणि अंतिम निर्णय घेण्यापूर्वी मूळ नाव आणि चिन्ह कोणत्या गटाला द्यायचं, हे आयोग कसं ठरवतो? हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो.

तसेच, ममत बॅनर्जी यांच्या गटाला ‘ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस’ हे नाव आणि ‘फुटबॉलपटू’ हे चिन्ह दिल्याचे आदेशात म्हटले आहे. आसाम आणि पश्चिम बंगालमध्ये होणाऱ्या पोटनिवडणुकासाठी हे चिन्ह आणि पक्षाचे नाव वापरता येणार आहे.

# हिंजवडी आयटी पार्कसाठी 'ॲक्शन प्लॅन'!

## वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सहा नवीन रस्ते; जिल्हाधिकाऱ्यांकडून भूसंपादनाला गती

**महाईन्यूज । पुणे**

**हिंजवडी आयटी पार्क परिसरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी सहा प्रमुख रस्ते निश्चित करण्यात आले आहेत. या रस्त्यांसाठी भूसंपादन, रस्त्याची आखणी आणि निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. रस्ते विकासासाठी आवश्यक प्रक्रिया वेगाने पूर्ण करून १ डिसेंबरपासून प्रत्यक्ष कामांना सुरुवात करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डुडी यांनी दिले.**



हिंजवडी, माण व मारुंजी भागातील रस्ते विकास, वाहतूक कोंडी, भूसंपादन आणि स्थानिक पायाभूत सुविधांच्या प्रश्नांवर उपाययोजना करण्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीला आमदार शंकर मांडेकर, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

हिंजवडी आयटी पार्क परिसरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी सहा प्रमुख रस्ते निश्चित करण्यात आले आहेत. या रस्त्यांसाठी भूसंपादन, रस्त्याची आखणी आणि निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. रस्त्यासाठी जमीन देणाऱ्या शेतकरी व जमीनमालकांना योग्य आणि जास्तीतजास्त लाभ मिळेल, याबाबत प्रशासनामार्फत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शेतकरी व जमीनमालकांकडून सुमारे ६० ते ७० टक्के जमिनीची संमती तसेच आगाऊ ताबा उपलब्ध झाल्यानंतर निविदा प्रक्रिया तातडीने सुरू करण्यात येईल. त्यामुळे रस्ते विकासाच्या कामांना अनावश्यक विलंब होणार नाही. भूसंपादनाची ६० ते ७० टक्के प्रक्रिया १५ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करून १ डिसेंबरपासून प्रत्यक्ष रस्ते कामांना सुरुवात करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

माण, मारुंजी आणि हिंजवडी परिसरातील शेतकरी व जमीनमालकांना भूसंपादन, हस्तांतरणीय विकास हक्काचे (टीडीआर) धोरण, दोन किलोमीटरच्या परिसरातील निवासी वापराचे नियम तसेच जमीन देणाऱ्यांना मिळणाऱ्या लाभांची माहिती देण्यासाठी गावनिहाय मार्गदर्शन शिबिरे घेण्यात येणार आहेत. प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन करावे, असे निर्देशही देण्यात आले.

### वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी उपाययोजना

भूमकर चौक, रावेतसह प्रमुख चौक आणि रस्त्यांवरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रस्ते रुंदीकरण, खड्डे बुजविणे आणि वाहतुकीतील अडथळे दूर करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. वाहतूक पोलिसांशी समन्वय साधून हलक्या वाहनांसाठी आवश्यक रस्ते खुले करणे तसेच डांबरीकरणाची कामे तातडीने हाती घेण्याचे नियोजन करण्यात आले.

### अतिरिक्त रस्त्यांची पाहणी

स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या मागणीनुसार सहा प्रमुख रस्त्यांव्यतिरिक्त आणखी दोन पर्यायी रस्त्यांची शक्यता तपासण्यात येणार आहे. विप्रो चौक, पुनवळे-मारुंजी जोडरस्ता तसेच कालव्यालगतच्या रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यकतेनुसार निर्णय घेण्यात येणार आहे. कालव्यालगत किंवा सिंचन विभागाच्या ताब्यातील जमिनींचा रस्ते विकासासाठी वापर करण्यासंदर्भातील प्रस्ताव ३० सप्टेंबरपर्यंत तयार करून संबंधित कालवा मंडळाकडे मंजुरीसाठी पाठविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात आवश्यक परवानगी मिळवून पुढील कार्यवाही करण्याची सूचना करण्यात आली.

# पुणे महापालिका ५०० वॉर्डनसाठी करणार १७ कोटी खर्च!

**महाईन्यूज । पुणे**

**काही दिवसांपूर्वी कात्रज- कोंढवा रस्त्यावर झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर आणि शहरातील विविध भागांत होत असलेली वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिकेने महत्त्वाच्या चौकांमध्ये 'ट्रॅफिक वॉर्डन' नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिका ५०० ट्रॅफिक वॉर्डन नेमणार असून, शहरातील महत्त्वाच्या २५० चौकांमध्ये त्यांची नियुक्ती केली जाणार आहे. यासाठी वर्षभरासाठी १७ कोटी ९ लाख रुपये खर्च होणार आहे.**



महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत रस्त्यांवर होत असलेल्या अपघातांबाबत सर्वपक्षीय नगरसेवकांनी नाराजी व्यक्त करून महापालिकेच्या कारभारावर टीका केली होती. शहरातील रस्त्यांवर महापालिकेची विकासकामे सुरू असून तेथे आवश्यक काळजी घेतली जात नसल्याने अपघात होत असल्याचा आरोप करण्यात आला. शहराचा विस्तार सर्व दिशांना होत असल्याने वाहनांची संख्याही वाढत चालली आहे. त्या तुलनेत वाहतुकीसाठी असलेले रस्ते अपुरे पडत असल्याने अनेक भागांत वाहतूक कोंडीचा त्रास नागरिकांना सहन करावा लागतो.

या पार्श्वभूमीवर शहरातील २५० चौकांमध्ये ट्रॅफिक वॉर्डन नियुक्त करण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी ठेवला. त्याला स्थायी समितीच्या बैठकीत नुकतीच मान्यता देण्यात आली. शहरात होणारी वाहतूक कोंडी ही 'तातडीची' बाब असल्याने कोणतीही निविदा प्रक्रिया न राबवता महापालिका आयुक्तांच्या अधिकारात हे काम देण्यात आले आहे. यासाठी वर्षाला १७ कोटी ९ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.

शहरात वाढत असलेली वाहनांची संख्या आणि प्रमुख रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी याचा विचार करून महापालिकेने अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी वाहतूक पोलिसांनी महापालिकेकडे केली होती. महापौर मंजूषा नागपुरे यांनीदेखील याला सकारात्मक प्रतिसाद देऊन रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी ट्रॅफिक वॉर्डन नियुक्त करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या होत्या.

स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले म्हणाले, वाहतूक कोंडी हा तातडीचा विषय असल्याने महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम ६७-३ (क) नुसार कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. या तरतुदीनुसार जनतेची सेवा, सुरक्षितता किंवा महापालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणासाठी आणीबाणीच्या परिस्थितीत आयुक्तांना तातडीने कार्यवाही करण्याचा अधिकार आहे.

### पदाधिकाऱ्यांच्या हट्ट अन् जाहिरात रद्द

महापालिका प्रशासनाने ट्रॅफिक वॉर्डन नियुक्तीसाठी निविदा प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठीची जाहिरात देखील तयार करण्यात आली होती. महापालिकेच्या सुरक्षा विभागाच्या वतीने ही जाहिरात काढण्यात येणार होती. मात्र महापालिकेतील एक पदाधिकाऱ्यांने हट्ट धरल्याने ही जाहिरात रद्द करण्यात आली. जुन्या ठेकेदारालच हे काम देण्यात आले आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# कचरा प्रश्नावर उबाळेंची दुटप्पी भूमिका चव्हाट्यावर!

## ई-प्रभाग अध्यक्षा तथा नगरसेविका अर्चना सस्ते यांचा घणाघात

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील कचरा समस्येबाबत शिवसेना शिंदे गटाच्या नगरसेविका सुलभा उबाळे यांची भूमिका दुटप्पी असून, राजकीय स्वार्थासाठी त्या शहराच्या हिताच्या उपाययोजनांमध्ये अडथळे निर्माण करीत आहेत, असा घणाघाती आरोप भारतीय जनता पार्टीच्या ई-प्रभाग अध्यक्षा तथा नगरसेविका अर्चना सस्ते यांनी केला आहे.**




पिंपरी-चिंचवड शहरातील संपूर्ण कचरा अनेक वर्षांपासून मोशी कचरा डेपोमध्ये आणला जातो. त्यामुळे मोशी आणि परिसरातील नागरिकांना दुर्गंधी, प्रदूषण तसेच आरोग्याशी संबंधित गंभीर समस्यांचा सामना करावा लागत आहे. या नागरिकांनी वर्षानुवर्षे संपूर्ण शहराच्या कचऱ्याचा भार सहन केला आहे. तरीही शहरातील कचऱ्याचे विकेंद्रीकरण करण्याच्या प्रशासनाच्या प्रयत्नांना विरोध केला जात असल्याची टीका सस्ते यांनी केली.

अर्चना सस्ते म्हणाल्या की, मोशी कचरा डेपो परिसरात दोन महिन्यांपूर्वी घडलेल्या भीषण दुर्घटनेत नऊ जणांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर सुलभा उबाळे यांनी सभागृहात आक्रमक भूमिका घेत आंदोलन केले तसेच प्रशासन, अधिकारी आणि लोकप्रतिनिधींवर आरोप केले. त्यानंतर शहरातील कचरा समस्येवर प्रशासनाने कोणत्या उपाययोजना केल्या, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला होता.

दरम्यान, प्रशासनाने शहरातील दहा ठिकाणी नवीन कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचे नियोजन केल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर उबाळे यांनी त्यांच्या प्रभागातील प्रस्तावित प्रकल्पाला विरोध केला. दुर्घटनेनंतर उपाययोजनांची मागणी करायची आणि प्रत्यक्ष उपाययोजना सुरू झाल्यानंतर त्यांनाच विरोध करायचा, ही भूमिका दुटप्पी असल्याचे सस्ते यांनी म्हटले आहे. “उबाळे यांच्या प्रभागातील नागरिक माणसे आहेत आणि मोशी व परिसरातील नागरिक माणसे नाहीत का? मोशीकरांना कचऱ्याचा त्रास होत नाही का? आम्ही त्यांच्या प्रभागातच प्रकल्प झाला पाहिजे, असा आग्रह धरत नाही. मात्र, प्रत्येक पर्यायाला राजकीय विरोध केला, तर शहरातील कचऱ्याची विल्हेवाट नेमकी कुठे लावायची, याचे उत्तर त्यांनी द्यावे,” असे आव्हान अर्चना सस्ते यांनी दिले.

भारतीय जनता पार्टी आणि आमदार महेशदादा लांडगे यांच्या पुढाकारातून शहरातील कचरा समस्येवर दीर्घकालीन उपाय म्हणून ‘वेस्ट टू एनर्जी’ प्रकल्प उभारण्यात आला. मात्र, या प्रकल्पावरही उबाळे यांनी आरोप केले. मोशीतील दुर्घटनेवर राजकारण करायचे आणि नवीन कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचा प्रयत्न केला तर त्यालाही विरोध करायचा, अशी त्यांची भूमिका शहरहिताची नसल्याचे सस्ते यांनी नमूद केले.

गेल्या ७० दिवसांमध्ये शहरात सुमारे दीड लाख टन अतिरिक्त कचरा साचल्याचा दावा करीत, या कचऱ्याचे काय करायचे आणि त्याची शास्त्रशुद्ध विल्हेवाट कशी लावायची, याबाबत उबाळे यांनी लोकप्रतिनिधी म्हणून स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी अर्चना सस्ते यांनी केली. “सुलभा उबाळे यांनी गेली २५ वर्षे शहराच्या राजकारणात काम केले आहे. मात्र, शहराच्या प्रश्नांवर विधायक पर्याय सुचविण्याऐवजी राजकीय आरोप करून स्वार्थ साधण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आता त्यांचा दुटप्पीपणा पिंपरी-चिंचवडकरांसमोर आला असून, नागरिक त्यांना कदापि माफ करणार नाहीत,” असा आरोपही सस्ते यांनी केला. शहरातील नागरिकांनी राजकीय स्वार्थातून आणि संकुचित विचारांतून विकासकामांना विरोध करणाऱ्यांपासून सावध राहावे, असे आवाहनही अर्चना सस्ते यांनी केले.

> “मोशीकर अनेक वर्षांपासून संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहराचा कचरा सहन करीत आहेत. दुर्घटना झाल्यानंतर उपाययोजनांची मागणी करायची आणि प्रशासनाने नवीन कचरा प्रक्रिया प्रकल्प प्रस्तावित केल्यानंतर त्याला विरोध करायचा, हा दुटप्पीपणा आहे. नवीन प्रकल्पही नको आणि मोशीतील कचऱ्याचे डोंगरही नको, तर शहरातील कचरा नेमका कुठे टाकायचा? सुलभा उबाळे यांनी याचे स्पष्ट उत्तर द्यावे.
>
> **- अर्चना सस्ते, ई-प्रभाग अध्यक्षा तथा नगरसेविका, भारतीय जनता पार्टी.**

---

# ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे आमदार महेश लांडगे यांनी घेतले आशीर्वाद

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी राळेगणसिद्धी येथे ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांच्या आश्रमशाळेला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी अण्णांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली. तसेच, विविध सामाजिक आणि विकासात्मक विषयांवर संवाद साधत त्यांचे आशीर्वाद घेतले.**



आमदार महेश लांडगे यांचे वडील वस्ताद किसनराव लांडगे आणि अण्णा हजारे यांच्यात अनेक वर्षांपासून घनिष्ठ मैत्री आहे. वस्ताद किसनराव लांडगे हे अण्णांना भेटण्यासाठी अनेकदा राळेगणसिद्धीला जात असतात. त्यामुळे लांडगे आणि हजारे कुटुंबीयांमध्ये आपुलकीचे आणि जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले आहेत. या भेटीदरम्यान जुन्या आठवणींना उजाळा मिळाला.

पिंपरी-चिंचवडमध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा जगातील सर्वांत उंच पूर्णाकृती पुतळा ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’ उभारण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची संकल्पना, सुरू असलेली कार्यवाही आणि भावी पिढ्यांसाठी या स्मारकाचे असलेले ऐतिहासिक महत्त्व याबाबत त्यांनी अण्णा हजारे यांना माहिती दिली. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, त्याग आणि राष्ट्रनिष्ठा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणाऱ्या या भव्य स्मारकाच्या उभारणीचे अण्णा हजारे यांनी विशेष कौतुक केले. सामाजिक आणि राष्ट्रहिताच्या कार्यासाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचा सल्लाही त्यांनी आमदार लांडगे यांना दिला.

अण्णा हजारे यांनी ग्रामविकास, व्यसनमुक्ती, पारदर्शक प्रशासन आणि भ्रष्टाचारविरोधी जनजागृतीसाठी आयुष्यभर केलेले कार्य समाजासाठी दीपस्तंभासारखे आहे. त्यांच्यासारख्या तपस्वी व्यक्तिमत्त्वाची भेट आणि मार्गदर्शन आपल्याला लोकहिताच्या कामासाठी नवी ऊर्जा देणारे असल्याची भावना आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केली.

### अण्णांचे मार्गदर्शन म्हणजे नवी ऊर्जा : आ. लांडगे

“माझे वडील वस्ताद किसनराव लांडगे आणि आदरणीय अण्णा हजारे यांच्यात अनेक वर्षांपासून स्नेहाचे संबंध आहेत. त्यामुळे अण्णांसोबत आमचा कौटुंबिक जिव्हाळा निर्माण झाला आहे. राळेगणसिद्धी येथे भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली आणि आशीर्वाद घेतले. ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’च्या उभारणीचे अण्णांनी केलेले कौतुक आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यांचे मार्गदर्शन लोकहितासाठी अधिक समर्पितपणे काम करण्याची नवी ऊर्जा देते.”



## भूमिका

**महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी, विद्येचे माहेरघर आणि समाजसुधारकांच्या विचारांचा वारसा लाभलेले पुणे गणेशोत्सवासाठी जगभर ओळखले जाते. मानाचे पाच गणपती असोत किंवा प्रसिद्ध गणेश मंडळे, बाप्पाच्या दर्शनासाठी दरवर्षी लाखो भाविक पुण्यात येतात. श्रद्धेचा हा महासागर पुण्याच्या सांस्कृतिक वैभवाची साक्ष देतो.**

# उत्सवातील व्हीआयपी

मात्र, या वैभवाला आता व्हीआयपी संस्कृती आणि वाहतूक कोंडीचे ग्रहण लागले आहे. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक एकोपा आणि सार्वजनिक सहभागाचे प्रतीक आहे. त्यामुळे बाप्पाच्या दरबारात सामान्य आणि विशेष असा भेद नसावा, हीच या उत्सवाची भावना. प्रत्यक्षात मात्र एखादा व्हीआयपी किंवा राजकारणी दर्शनासाठी आला की, वाहतूक व्यवस्था बदलणे, रस्ते बंद करणे, मार्ग वळवणे आणि मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करणे, हे नित्याचे झाले आहे.

सर्वसामान्य भाविक तासन्तास रांगेत उभा असताना काही मान्यवरांना विशेष प्रवेश दिला जातो. हा प्रश्न केवळ दर्शनाचा नसून समानतेच्या भावनेचा आहे. बाप्पाच्या दर्शनासाठी आलेल्या प्रत्येक भाविकाला समान वागणूक मिळणे अपेक्षित असताना व्हीआयपींसाठी विशेष व्यवस्था करण्याची गरज काय, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.

याचा थेट परिणाम पुण्याच्या दैनंदिन जीवनावर होतो. लक्ष्मी रोड, बाजीराव रोड, शिवाजी रोड, केळकर रोड यांसारख्या प्रमुख मार्गांवर वाहतूक ठप्प होते. कार्यालयात जाणारे कर्मचारी, विद्यार्थी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिक तासन्तास कोंडीत अडकतात. पीएमपीएमएलच्या बसचे मार्ग बदलले किंवा फेऱ्या रद्द झाल्या, तरी त्याचा फटका पुन्हा सामान्य प्रवाशांनाच बसतो.

यातील सर्वाधिक गंभीर बाब म्हणजे रुग्णवाहिकांचा प्रश्न. वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका अडकली आणि उपचाराला विलंब झाला, तर त्याची किंमत एखाद्या जीवाला मोजावी लागू शकते. व्हीआयपींच्या वाहनांसाठी मार्ग मोकळा आणि रुग्णवाहिकेसाठी अडथळा, असे चित्र कोणत्याही संवेदनशील समाजाला मान्य होऊ नये.

त्यामुळे प्रशासनाने व्हीआयपी दर्शनासाठी स्पष्ट नियम आखण्याची गरज आहे. गर्दीच्या वेळेत विशेष प्रवेश टाळणे, डिजिटल दर्शनाचा पर्याय उपलब्ध करून देणे आणि व्हीआयपींच्या सुरक्षेसाठी सामान्य वाहतुकीवर कमीतकमी परिणाम होईल, याची काळजी घेणे आवश्यक आहे. रुग्णवाहिका आणि अग्निशमन दलासाठी स्वतंत्र मार्गाची काटेकोर अंमलबजावणीही झाली पाहिजे.

गणेशोत्सव हा पुण्याच्या अस्मितेचा आणि आनंदाचा उत्सव आहे. तो काही मोजक्या मान्यवरांच्या दौऱ्यांमुळे सर्वसामान्यांसाठी त्रासाचा अनुभव बनता कामा नये. बाप्पाच्या दरबारात समानतेचा संदेश दिला जातो; तो रस्त्यावरही दिसला पाहिजे. श्रद्धेचा सन्मान राखतानाच नागरिकांच्या वेळेचा, सुरक्षिततेचा आणि दैनंदिन जीवनाचा सन्मान करणे ही प्रशासन, गणेश मंडळे आणि लोकप्रतिनिधींची सामूहिक जबाबदारी आहे.



## प्रासंगिक »

# अतिरेक नको

**एकदा एक राजहंस एका बगळ्यास म्हणाला, 'काय रे तू आधाशी ! पाण्यात-ला कोणताही प्राणी खायला तू मागेपुढे पहात नाहीस. बरं-वाईट, नासकं हा फर-कसुद्धा तुझ्या खादाड जिभेला समजत नाही.**

माझं पहा, मी फक्त पूर्ण उमलले-ल्या कमळातले तंतु तेवढे खाईन, दुसरा कसलाही पदार्थ माझ्या घशाखाली जाणार नाही.' त्यावर बगळा म्हणाला,

'माझ्या दृष्टीने असा चोखंदळपणा असणं बरं नव्हे. ज्या वेळी जे मिळेल ते खावं अन् सुखी राहावं. खाण्याचा पदार्थ दिसला की तो खावा हेच शहाणपणाचं. असे म्हणून बगळा उडाला व जवळच्या तलावाकाठी गेला.

तेथे कडेला एक मासा दिसला. तेव्हा विचार न करता त्याने तो एकदम गिळला, पण आत असलेला गळ घशाला लागून तो जिवास मुकला. राजहंस आपले आवडते खाणे दुसऱ्या कमळे असलेल्या तळ्यात गेला, पण तेथे हंस धरण्यासाठी जाळे लावले होते, त्यात तो सापडला.

- तात्पर्य :

**कोणत्याही गोष्टीचा अतिरेक नको..**

गणेशोत्सव हा केवळ श्रद्धेचा आणि सांस्कृतिक उत्सव नसून समाजप्रबोधनाचेही प्रभावी माध्यम आहे. याच उद्देशाने माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने 'लोकसंवाद-२०२६' उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत सायबर पोलीस ठाणे, पुणे शहर यांच्या माध्यमातून नागरिकांना सायबर गुन्हे आणि त्यापासून बचावाच्या उपाययोजनांची माहिती दिली जात आहे.

# सायबर फसवणूक; सावधगिरी हाच सुरक्षिततेचा मार्ग

मोबाईल, इंटरनेट, ऑनलाइन बँकिंग, डिजिटल व्यवहार आणि समाजमाध्यमांचा वापर वाढत असताना सायबर फसवणुकीचे प्रकारही वाढले आहेत. गुन्हेगार भीती दाखवणे, आमिष देणे किंवा भावनिक दबाव निर्माण करणे अशा विविध पद्धती वापरतात. त्यामुळे अनोळखी फोन, संदेश, लिंक किंवा ऑनलाइन ओळखीवर सहज विश्वास न ठेवता प्रत्येक वेळी खातरजमा करणे आवश्यक आहे.

'डिजिटल अरेस्ट'मध्ये सायबर गुन्हेगार स्वतःला पोलीस किंवा तपास यंत्रणेचे अधिकारी असल्याचे भासवून गुन्हा दाखल असल्याची भीती दाखवतात आणि पैसे मागतात. कोणतीही सरकारी तपास यंत्रणा फोन किंवा व्हिडीओ कॉलवर कारवाई टाळण्यासाठी पैसे मागत नाही. त्यामुळे अशा कॉलला घाबरून पैसे देऊ नयेत.

तुमचा मोबाईल क्रमांक बंद होणार आहे, केवायसी अपूर्ण आहे, पार्सल सीमाशुल्क विभागाने अडवले आहे किंवा वीज-बिल थकीत आहे, अशा कारणांनीही फसवणूक केली जाते. संबंधित सेवा प्रदात्याच्या अधिकृत माध्यमातून माहिती



तपासल्याशिवाय कोणतीही लिंक उघडू नये किंवा वैयक्तिक माहिती देऊ नये.

व्हॉट्सॲप व्हिडीओ कॉलद्वारे रेकॉर्डिंग करून नंतर त्याचा गैरवापर करण्याची धमकी देत पैशांची मागणी केली जाऊ शकते. या प्रकाराला 'सेक्सटॉर्शन' म्हणतात. अशा वेळी घाबरून पैसे न देता पुरावे जतन करून तातडीने पोलिसांकडे तक्रार करावी.

'घरबसल्या काम करा', 'टास्क पूर्ण करून पैसे मिळवा', शेअर बाजार किंवा क्रिप्टोमध्ये मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवणाऱ्या जाहिरातींपासूनही सावध राहावे. बनावट कर्ज ॲप, टेलिग्राम-व्हॉट्सॲप समूह आणि डेटिंग ॲपवरील ऑनलाइन ओळखींच्या माध्यमातूनही आर्थिक फसवणूक होऊ शकते.

विशेषतः अनोळखी एपीके फाइल डाउनलोड करू नका. 'SBI.apk', 'RTO Challan.apk', 'e-Challan.apk', 'MNGL.apk' अशा नावांनी आलेल्या संशयास्पद फाइल्स मोबाईलमध्ये इन्स्टॉल केल्यास संवेदनशील माहितीचा गैरवापर होऊ शकतो. तसेच आपले बँक खाते, एटीएम कार्ड किंवा इंटरनेट बँकिंग सुविधा अनोळखी व्यक्तीला वापरण्यास देऊ नये. खात्यात संशयास्पद रक्कम जमा झाल्यास ती स्वतःहून पुढे पाठवू नये.

ओटीपी, पासवर्ड, एटीएम पिन, बँक तपशील, आधार-पॅनची प्रत किंवा वैयक्तिक माहिती कोणालाही देऊ नये. मजबूत पासवर्ड, द्विस्तरीय प्रमाणीकरण आणि योग्य गोपनीयता सेटिंगचा वापर करावा. समाजमाध्यमांवर वैयक्तिक माहिती सार्वजनिक करणे टाळावे.

सायबर फसवणूक झाल्यास वेळ न दवडता १९३० या राष्ट्रीय सायबर गुन्हे हेल्पलाइनवर संपर्क साधावा आणि cybercrime.gov.in वर तक्रार नोंदवावी.

डिजिटल जगात सुरक्षित राहण्याचा मूलमंत्र एकच-घाई करू नका, घाबरू नका आणि खातरजमा केल्याशिवाय पैसे किंवा माहिती देऊ नका. सावधगिरी, जागरूकता आणि जबाबदारी हीच सायबर सुरक्षेची खरी गुरुकिल्ली आहे.

## ।। अभंगवाणी ।।



सावध जालों सावध जालों ।
हरिच्या आलों जागरणा ॥१॥

तेथें वैष्णवांचे भार ।
जयजयकार गर्जतसे ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महाराष्ट्रात ९९० कोटींचे रेल्वे प्रकल्प मंजूर

## मुंबई-पुणे परिसरासह विदर्भातील वाहतूक आणि उद्योगांना मिळणार नवी चालना

**महाईन्यूज । मुंबई**

**महाराष्ट्रातील रेल्वेचे जाळे अधिक मजबूत करण्यासाठी आणि प्रवाशांचा प्रवास सुकर करण्यासाठी भारतीय रेल्वेने मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील रेल्वे क्षमता वाढवणे आणि मालवाहतूक अधिक वेगाने व्हावी, यासाठी केंद्र सरकारने ९९० कोटी रुपयांच्या दोन प्रमुख पायाभूत सुविधा प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. यामध्ये एका महत्त्वाच्या मार्गाचे दुहेरीकरण (DOUBLING) आणि एका नव्या रेल्वे मार्गाच्या बांधकामाचा समावेश आहे. या दोन्ही प्रकल्पांमुळे राज्यातील प्रवासी वाहतुकीला गती मिळण्यासोबतच औद्योगिक आणि खाण क्षेत्रातील मालवाहतुकीला मोठा दिलासा मिळणार आहे.**



मध्य रेल्वेच्या अंतर्गत येणाऱ्या पनवेल-चौक-कर्जत या अत्यंत महत्त्वाच्या मार्गावरील चौक ते कर्जत या १०.८६ किलोमीटरच्या टप्प्याचे दुहेरीकरण केले जाणार आहे. यासाठी ४९७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. सध्या हा टप्पा एकेरी असल्यामुळे गाड्यांच्या वेगावर मर्यादा येतात आणि मार्गिकेवर ताण निर्माण होतो. दुहेरीकरण पूर्ण झाल्यानंतर या मार्गावर दररोज दोन्ही बाजूंनी ५ नवीन प्रवासी गाड्या सुरू करणे शक्य होणार आहे. तसेच एकेरी मार्ग असल्यामुळे गाड्या क्रॉसिंगसाठी थांबवून ठेवाव्या लागत होत्या, दुहेरीकरणामुळे ही समस्या सुटून गाड्यांची विनाअडथळा वाहतूक होईल. याशिवाय दरवर्षी तब्बल १८.३५ दशलक्ष टन अतिरिक्त मालवाहतूक हाताळण्याची क्षमता या मार्गावर निर्माण होईल, ज्यामुळे मालगाड्यांचा खोळंबा टळेल.

दुसरा महत्त्वाचा प्रकल्प विदर्भातील यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यांसाठी मोठ्या बदलाचा ठरणार आहे. मुकुटबन (आदिलाबाद) ते गडचांदूर दरम्यान ३८.२१ किलोमीटरचा नवीन रेल्वे मार्ग तयार केला जाणार असून, यासाठी ४९३ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. यवतमाळ आणि चंद्रपूर हे जिल्हे औद्योगिक व खाणकामासाठी ओळखले जातात, त्यामुळे या नव्या मार्गामुळे या भागातील उद्योगधंद्यांना थेट रेल्वे जाळ्याशी जोडले जाईल. सध्याच्या गजबजलेल्या वर्धा-मानिकगड मार्गावरील ताण कमी करण्यासाठी हा नवीन रेल्वे कॉरिडॉर एक उत्तम पर्यायी मार्ग ठरेल. हा मार्ग सुरू झाल्यानंतर दोन्ही बाजूंनी दररोज २ मेमू (MEMU) लोकल गाड्या चालवण्याचे नियोजन असून स्थानिक प्रवाशांना अत्यंत कमी खर्चात आणि वेगाने प्रवास करता येईल. तसेच या मार्गावरून दरवर्षी ६.०८ दशलक्ष टन मालाची वाहतूक होणे अपेक्षित असून विशेषतः कोळसा, सिमेंट, लोखंड-पोलाद, खते आणि अन्नधान्याची वाहतूक अधिक जलद गतीने होईल.

### रेल्वे वाहतुकीवर काय होणार परिणाम?

भारतीय रेल्वेने मंजूर केलेले हे दोन्ही प्रकल्प महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागांतील रेल्वे नेटवर्क मजबूत करणारे आहेत. चौक-कर्जत दुहेरीकरणामुळे मुंबई-पुणे आणि उपनगरीय परिसरातील वाहतूक सुधारण्यास मदत होईल, तर मुकुटबन-गडचांदूर मार्गामुळे विदर्भातील औद्योगिक क्षेत्राला मोठा आर्थिक बूस्टर मिळेल. एकंदरीत, या ९९० कोटींच्या गुंतवणुकीमुळे भविष्यात प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर, वेगात आणि सुरळीत होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# शरद पवारांच्या पत्रावर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रत्युत्तर

**महाईन्यूज । नागपूर**

**राज्यावर दुष्काळाचे सावट असून विरोधी पक्षाने राज्य सरकारवर टीका सुरू केली आहे. दुष्काळावरून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे नेते शरद पवार यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिले. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावरून शुक्रवारी त्यांच्यावर टीका केली.**





महसूलमंत्री बावनकुळे नागपुरात प्रसारमाध्यमासोबत बोलत होते. ते म्हणाले, माझ्याकडेही शरद पवार यांचे पत्र आले आहे. दुष्काळावर राजकारण करण्याची गरज नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागील मंत्रिमंडळाच्या बैठकीतच सर्व विभागाला यासंबंधी आवश्यक सूचना दिल्या आहेत. कुठल्या उपाययोजना करायच्या, याबाबत सर्वेक्षण करण्याची गरज आहे. सात-आठ दिवसांत अहवाल येईल. सर्व जिल्हाधिकारी, मदत व पुनर्वसन विभाग, कृषी विभागाने पंचनामे तयार करण्याचे काम सुरू केले आहे, असे ते म्हणाले.

बावनकुळे म्हणाले, पंचनामे पूर्ण होऊन त्याचा अहवाल आमच्याकडे येईल. मदतीसाठी काही प्रस्ताव केंद्राकडे पाठवावे लागेल, काही मदत राज्य सरकारकडून करावी लागेल. दुष्काळाच्या स्थितीतील सर्व प्रक्रियेला प्राधान्य देण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यासाठी संवेदनशील आहेत. मंगळवार, बुधवारपर्यंत यासंदर्भात अंतिम अहवाल येण्याची अपेक्षा आहे. या अहवालाच्या आधारावर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी उपाययोजनांबाबत निर्णय घेण्यात येईल.

सर्व मंत्री, पालकमंत्री, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकाऱ्यांना दुष्काळाची पाहणी करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. आमदारांनाही त्यांच्या भागातील स्थितीची पाहणी करून शेतकऱ्यांचे ऐकूण घ्यावे, अशा सूचना दिल्या आहेत. भविष्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांना पूर्ण मदत झाली पाहिजे, यासाठी संपूर्ण माहितीची गरज असून सर्वेक्षण सुरू आहे. महाराष्ट्रातील काही जिल्ह्याची मी स्वत: पाहणी करणार आहे. मोका तपासणी करावीच लागेल, प्रत्येकाला जावेच लागेल. दुष्काळाची तीव्रता किती आहे, या आधारावर निर्णय घेतला जाईल, असे ते म्हणाले. चारा छावणीमध्ये मागील वेळी भ्रष्टाचार झाला होता. यावेळी भ्रष्टाचार होणार नाही. कृत्रिम पावसाचा प्रयोग कुठेच यशस्वी झाला नाही. परतीचा पाऊस झाल्यास दुष्काळाचे संकट थोडे कमी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अवैध वाहतूक थांबविण्यासाठी गौण खनिजाबाबत नवीन नियम येणार आहे. नागरिकांना घर बांधण्यासाठी किती रेती लागेल, तेवढी रॉयल्टी द्यायची, वाहतूकदारांच्या मागे लागण्याची गरज नाही, असे ते म्हणाले. खनिजाबाबत संपूर्ण राज्यावर लक्ष ठेवले जाणार आहे. त्यामुळे २५ हजार कोटी महसूल येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याबाबत चांदीवाल आयोगाचा अहवाल योग्य व्यासपीठावर जाहीर करू, असे ते आमदार रोहित पवारांच्या मागणीवर म्हणाले.

### कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खरगे यांच्यावरही टीका

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवशी दिवे लावण्यावरून कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी एक दिवा पश्चातापाचाही लावावा, अशी टीका केल्याकडे लक्ष वेधले असता बावनकुळे म्हणाले, मल्लिकार्जुन खरगे यांना वेड लागले आहे. पंतप्रधानांच्या वाढदिवशी दिवा लावला तर खरगेंचे काय गेले? खरगे यांनी आपल्या वाढदिवसाला फटाके फोडावे, दिवाळी करावी आम्हाला काय देणे-घेणे, असे नमुद करीत ते म्हणाले, जनतेची श्रद्धा आहे, त्यांनी दिवे लावले. आम्ही जनतेला दिवे लावायला सांगितले नाही, परंतु पंतप्रधानांना अशा उपक्रमातून नवी उर्जा मिळावी, म्हणून जनतेनेच पुढाकार घेतला, असे त्यांनी सांगितले. इंडिया आघाडीचे जहाज बुडले. मागच्या दोन वर्षात बैठकच झाली नाही. कॉंग्रेस, उद्धव ठाकरे यांनी आपापली चिंता करावी, असा सल्ला त्यांनी दिला.

# पाकिस्तानात मशिदीजवळ भीषण स्फोट

## कोहाटमध्ये १४ जणांचा मृत्यू, ५० हून अधिक जखमी; स्फोटाचे कारण अद्याप अस्पष्ट

**महाईन्यूज । पाकिस्तान**

**पाकिस्तानमधील कोहाट येथे मशिदीजवळ भीषण स्फोट झाल्याची माहिती समोर आली आहे. या स्फोटात १४ जण ठार झाले असून, अनेक जण जखमी झाले आहेत. स्फोटानंतर बचाव पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरु केले. समोर आलेल्या अधिकच्या माहितीनुसार स्फोटात जखमी झालेल्यांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे.**



आंतरराष्ट्रीय माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, कोहाट येथील जुनी पोलीस लाईन परिसरात हा स्फोट झाला. मशिदीच्या जवळच हा स्फोट झाल्याचे काही स्थानिकांनी म्हटले आहे. स्फोट झाल्यानंतर बचाव पथक आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, हा स्फोट नेमका कशामुळे झाला? याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी बंदोबस्त वाढवला असून, रस्ते वाहतुकीसाठी बंद केले आहेत.

या घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांची संख्या अधिक असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, स्थानिक माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार स्फोटा १४ जणांचा मृत्यू झाला असून, ५० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. दगावलेल्या नागरिकांचे मृतदेह जिल्हा रुग्णालयात ठेवण्यात आले आहेत. स्फोटानंतर परिसरात अतिरिक्त पोलिस फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. प्रशासनाकडून नागरिकांना देखील सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या स्फोटामागे आत्मघाती हल्लेखोर असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. मात्र, या हल्ल्याची जबाबदारी अद्याप कोणत्याही दहशतवादी संघटनेने स्वीकारलेली नाही. हल्ल्याचा नेमका उद्देश आणि स्फोटामागील सूत्रधारांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा यंत्रणांकडून तपास सुरू आहे. स्फोटानंतर पोलीस लाइन्स परिसरात अतिरिक्त सुरक्षा दल तैनात करण्यात आले आहे. तसेच कोहाट-हांगू मार्गावरील वाहतूकही तात्पुरती बंद करण्यात आल्याची माहिती आहे.

पोलिसांनी कोहाट हंगू रस्ता वाहतुकीसाठी बंद केला असून, नागरिकांना पर्यायी मार्गाचा वापर करण्यास सांगितले आहे. पोलिसांकडून या घटनेचा तपास सुरु करण्यात आला असून, स्फोट कशामुळे झाला? याच्या नेमक्या कारणाचा शोध घेतला जात आहे.

### मशिदीची भिंत कोसळली

स्फोटाची तीव्रता इतकी मोठी होती की मशिदीच्या बाहेरील भागाचे मोठे नुकसान झाले असून एक भिंत कोसळली. स्फोटामुळे मशिदीबाहेर जमिनीत मोठा खड्डाही पडला. आसपासच्या काही इमारतींचेही नुकसान झाले आहे. स्फोटाची माहिती मिळताच बचाव पथके, रुग्णवाहिका आणि अतिरिक्त सुरक्षा दल घटनास्थळी दाखल झाले. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांचा शोध घेण्यासाठी बचावकार्य सुरू करण्यात आले असून जखमींना जवळच्या रुग्णालयांमध्ये हलवण्यात आले.

## दिल्लीत १६ वर्षीय मुलीची सामुहिक बलात्कार करून हत्या, ३ आरोपी अल्पवयीन

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**दिल्लीच्या उत्तरेकडच्या भागात १६ वर्षीय मुलीवर सामूहिक लैंगिक अत्याचार करून तिची चाकूने हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तिची हत्या करून तिचा मृतदेह शेतात फेकण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. मृतदेह इतका कुजला होता की सुरुवातीला तो महिलेचा आहे की पुरुषाचा, हेही स्पष्टपणे ओळखता आले नव्हते. या प्रकरणात तीन अल्पवयीन मुलांसह चौघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.**



१२ आणि १३ सप्टेंबरच्या मध्यरात्री उत्तर-पश्चिम दिल्लीतील स्वरूप नगर परिसरातील कुशक रोडवरील जयपाल राणा यांच्या शेताजवळ एका मुलीचा मृतदेह आढळला. मृतदेहाची अवस्था अत्यंत वाईट झाली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतदेहाचे काही भाग भटक्या कुत्र्यांनी खाल्ले होते. तसेच तिचा एक हात शरीरापासून वेगळा झालेला सापडला. मृतदेह कुजल्यामुळे सुरुवातीला ओळख पटवणेही कठीण झाले.

पोलिसांच्या माहितीनुसार, ही घटना १० सप्टेंबरच्या रात्री घडल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मुलगी तिच्या १७ वर्षीय मित्राला भेटण्यासाठी गेली होती. त्याने आपल्या तीन मित्रांना बोलावले. काही वेळ एकत्र घालवल्यानंतर चौघांनी तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. मुलीने पोलिसांत तक्रार करण्याची धमकी दिल्यानंतर आरोपींनी तिच्यावर चाकूने वार करून हत्या केली आणि मृतदेह झुडपांजवळ टाकून दिल्याचा पोलिसांचा दावा आहे.

पोलिसांनी सांगितले की, मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार तिच्या कुटुंबीयांनी दाखल केली नव्हती. चौकशीदरम्यान कुटुंबीयांनी ती अनेकदा घरातून बाहेर जात असे आणि काही दिवसांनी परत येत असे, अशी माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यामुळे तिच्या कुटुंबीयांनी तातडीने ती बेपत्ता असल्याची तक्रार केली नव्हती.

पोलिसांनी सांगितले की, या घटनेचा कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नव्हता आणि त्यामुळे सुरुवातीला आरोपींची ओळख पटवणे कठीण होते. मात्र, ५० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमधील फूटेज तपासल्यानंतर त्यांना गुन्ह्याच्या ठिकाणाजवळ एक टेम्पो जाताना दिसला. पोलिसांनी टेम्पोच्या मालकाशी संपर्क साधला. त्या रात्री टेम्पो त्याच्या एका मित्राने नेल्याचे त्याने पोलिसांना सांगितले.

प्राथमिक पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१), २३८(ए), ६५(१) आणि ३(५) तसेच पॉक्सो कायद्याच्या कलम ६ अंतर्गत एफआयआर दाखल केली आहे.

भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) हे हत्येशी संबंधित आहे, तर कलम २३८ पुरावे नष्ट करणे किंवा आरोपीला वाचवण्यासाठी खोटी माहिती देण्याशी संबंधित आहे. कलम ३(५) अनेक व्यक्तींनी समान हेतूने केलेल्या कृत्याशी आहे. पॉक्सो कायद्याचे कलम ६ हे अल्पवयीन मुलांवर लैंगिक अत्याचाराशी संबंधित आहे. या प्रकरणात नेमकी घटना कशी घडली? प्रत्येक ताब्यात घेतलेल्या व्यक्तीची भूमिका काय होती? आणि आणखी कोणी या गुन्ह्यात सहभागी आहे का? याचा तपास सुरू आहे.

### चौघे ताब्यात

१५ आणि १६ सप्टेंबरच्या मध्यरात्री पोलिसांनी रात्रभर शोधमोहीम राबवली. संशयित टेम्पोचा शोध घेऊन त्याच्या चालकाची ओळख पटवण्यात आली आणि त्याची चौकशी करण्यात आली. या चौकशीतून मिळालेल्या माहितीच्या आधारे गुन्ह्याशी संबंधित चार जणांना ताब्यात घेण्यात आले, अशी माहिती पोलिस उपायुक्तांनी दिली. ताब्यात घेतलेल्या चौघांपैकी दोघे १७ वर्षांचे, एक १६ वर्षांचा आणि एक १९ वर्षांचा आहे. पोलिसांनी आरोपींकडून दोन चाकू जप्त केल्याचेही सांगितले आहे.

# हनुमान अंशची 6 आठवड्यात 'हनुमान उडी'



नीम करोली बाबा यांच्यावर आधारित भक्ती चित्रपट हनुमान अंशने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आहे. बॉक्स ऑफिसवरली हनुमान अंशचा वाढता प्रभाव काही कमी होण्याचे नाव घेत नाहीये. रिलीजनंतर ४२ व्या दिवशी देखील या चित्रपटाने धडाकेबाज कमाई करणं सुरूच ठेवलं आहे. विशेष म्हणजे हनुमान अंशच्या समोर मिर्झापूर आणि हैवान सारख्या दोन तगड्या फिल्म असताना देखील हनुमान अंशची हनुमान उडी जोरदार सुरू आहे. गुरूवारी डॉक्टर विशाल चतुर्वेदींच्या दिग्दर्शनातील चित्रपटाने आपला सहावा आठवडा पूर्ण केला. हनुमान अशंची ५ व्या आठवड्याच्या तुलनेत ६ व्या आठवड्यातील कमाई ही ११.०८ टक्क्यांनी घटली आहे. मात्र तरीसुद्धा नीम करोली बाबांवरील या चित्रपटाने मिर्झापूर द मुव्ही आणि नुकतीच रिलीज झालेल्या हैवानला घाम फोडला आहे. फक्त २ कोटी बजेटमध्ये तयार झालेल्या या चित्रपटाने देशात तब्बल १२,०६९ टक्क्यांचा नफा कमावला आहे. तर वर्ल्डवाईड या चित्रपटाने ३०९ कोटींचा गल्ला कमवला आहे. शुक्रवारी १८ सप्टेंबर रोजी बॉक्स ऑफिसवर अजून दोन नवीन चित्रपट रिलीज झाले आहेत. करीना कपूर स्टारर दायरा आणि कुणाल खेमूचा वाईब हे दोन चित्रपट रिलीज झाला आहेत. मात्र हनुमान अंश ज्या प्रकारे कल्ट ब्लॉकबास्टर ठरली आहे ते पाहता या दोन चित्रपटांचा त्यावर कोणता प्रभाव पडले असं वाटत नाही. मिर्झापूर सारखी स्टारकास्टने दणकट आणि प्रसिद्धीच्या शिखरावर असलेल्या चित्रपटाला देखील दुसऱ्या आठवड्यात फक्त ५४.७५ कोटी नेट बिजनेस करता आला आहे. फ्लॉप ठरलेला हैवान या चित्रपटाने पहिल्या आठवड्यात फक्त ९.८५ कोटी रूपये कमवले आहेत. Sacnilk ने दिलेल्या माहितीनुसार शोभिनव सत्यची प्रमुख भूमिका असलेल्या हनुमान अंशने गुरूवारी ४२ व्या दिवशी देशातील ९१६० शोजमधून ६.२५ कोटी रूपये नेट कमाई केली. याबरोबरच भारतात या चित्रपटाने एकूण २८७.४० कोटींची तर एकूण नेट कलेक्शन २४३.३८ कोटी झाली आहे.



# तमन्नाने सांगितला प्रसंग

लोकप्रिय बॉलिवूड अभिनेत्री तमन्ना भाटिया सध्या तिच्या आगामी 'द वन' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. १६ सप्टेंबर रोजी या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला. प्रेक्षकांकडून या चित्रपटाच्या ट्रेलरला चांगला प्रतिसाद मिळत आहे. अशातच ट्रेलर लाँच कार्यक्रमादरम्यान तमन्नाने चित्रपटातील 'छठी मैया' या गाण्याच्या चित्रीकरणाचा अनुभव सांगितला. या गाण्याचे चित्रीकरण करताना आपण भावुक झाल्याचे तिने सांगितले. 'छठी मैया' या गाण्यात छठ पूजा आणि बिहारी संस्कृतीची झलक पाहायला मिळते. मुंबईत वाढल्यामुळे तिला छठ पूजेच्या परंपरांची फारशी माहिती नव्हती. जुहू बीचवर छठ पूजा साजरी करताना मोठी गर्दी तिने पाहिली होती. मात्र या सणामागील श्रद्धा आणि परंपरा तिला माहीत नव्हत्या, असे तमन्नाने सांगितले. ती म्हणाली, "हा चित्रपट आम्हा सर्वांसाठी खूप खास आहे. आपल्या देशात अनेक लोककथा आहेत आणि त्यांना मोठ्या पडद्यावर आणण्यासाठी खूप धाडस लागते. मी जुहू बीचवर छठ पूजा साजरी करणारी प्रचंड गर्दी पाहिली होती, पण या सणाशी संबंधित परंपरांबद्दल मला फारशी माहिती नव्हती. मी मुंबईत मोठी झाले. छठ पूजा हा एक मोठा सण आहे, पण मला त्याबद्दल फारशी माहिती नव्हती. पण जेव्हा गाण्याचे चित्रीकरण केले, तेव्हा मला कळले की यात खूप कडक उपवास असतो, ज्यामध्ये लोक ३६ तास पाण्याशिवाय राहून देवीची पूजा करतात." या गाण्याचे शूटिंग करताना तिच्या डोळ्यांत नकळत अश्रू आले. कलाकार म्हणून आपण एका माध्यमासारखे असतो आणि काही अनुभव आपल्यापेक्षा मोठ्या शक्तीशी जोडलेले असल्याचे तिला जाणवले. 'द वन'मध्ये सिद्धार्थ मल्होत्रा मुख्य भूमिकेत असून दीपक कुमार मिश्रा यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. सुनील ग्रोव्हर, श्वेता तिवारी आणि अनुप सोनी यांच्याही महत्वाच्या भूमिका आहेत. हा चित्रपट २५ सप्टेंबर २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.



# मला प्रेमात पडायला आवडेल

अभिनेत्री तेजश्री प्रधान मराठी मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय नाव आहे. अनेक मालिका आणि सिनेमांमधून तिने आपल्या अभिनयाची छाप प्रेक्षकांच्या मनावर उमटवली आहे. त्यामुळे तेजश्रीच्या अभिनयासोबतच तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दलही चाहत्यांना कायम उत्सुकता असते. गेल्या काही दिवसांपासून तेजश्री पुन्हा एकदा तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. याचं कारण म्हणजे अभिनेत्रीने दुसऱ्यांदा प्रेमात पडण्याबद्दल आणि लग्नाबद्दल केलेलं वक्तव्य. तेजश्री प्रधानने अभिनेता शशांक केतकरसोबत लग्न केलं होतं. दोघांची जोडी त्यावेळी चाहत्यांमध्येही लोकप्रिय होती. मात्र, त्यांचं लग्न फार काळ टिकलं नाही. काही काळानंतर दोघांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला आणि त्यांचा घटस्फोट झाला. या घटनेनंतर तेजश्रीने आपल्या कामावर लक्ष केंद्रित केलं आणि ती मनोरंजन क्षेत्रात सक्रिय राहिली. आता एका मुलाखतीमध्ये तेजश्रीला पुन्हा प्रेमात पडणार का, असा प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाचं उत्तर देताना अभिनेत्रीने प्रेम आणि लग्नाबाबत तिचं मत मोकळेपणाने व्यक्त केलं. दुसऱ्यांदा प्रेमात पडणार का, असं विचारल्यानंतर तेजश्रीने होकार देत उत्तर दिलं. ती म्हणाली, 'मला तर प्रेमात पडायला आवडेल. माझं लग्न व्हावं, हे तर माझ्या जवळच्या मित्रमंडळींचं स्वप्न आहे...' तेजश्रीच्या या वक्तव्यामुळे तिच्या चाहत्यांमध्ये पुन्हा चर्चांना सुरुवात झाली आहे. अभिनेत्रीला भविष्यात पुन्हा लग्न करायचं आहे का, तिच्या आयुष्यात कोणी खास व्यक्ति आहे का, असे प्रश्नही चाहत्यांकडून उपस्थित केले जात आहेत. मात्र, तेजश्रीने सध्या तिच्या आयुष्यात कोणती व्यक्ती आहे किंवा ती कोणासोबत रिलेशनशिपमध्ये आहे, याबाबत कोणतीही माहिती दिलेली नाही.

# ऐतिहासिक आझाद मैदानावर क्रिकेटचे पुनरागमन

## ९ वर्षांनंतर एमसीएच्या ताब्यात ८ खेळपट्ट्या; १६ क्लब्जना बसला होता मेट्रो प्रकल्पाचा फटका

**महाईन्यूज । मुंबई**

**मुंबईसह आणि भारतीय क्रिकेटची नर्सरी असलेल्या ऐतिहासिक आझाद मैदानावर क्रिकेटचे पुनरागमन झाले आहे. तब्बल नऊ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर या मैदानातील आठ क्लब्सना त्यांच्या नूतनीकरण केलेल्या खेळपट्ट्या परत मिळणार आहेत. मुंबई मेट्रो ३ च्या बांधकामासाठी एमएमआरडीएने २०१७ मध्ये संबंधित क्लबसच्या जागा ताब्यात घेतल्या होत्या.**



आझाद मैदानातील २२ पैकी १६ क्लब्सना मेट्रो प्रकल्पाचा फटका बसला. यामध्ये पारसी सायक्लिस्ट्स, बॅरोनेट, जॉन ब्राइट, बोहरा क्रिकेटर्स आणि नवरोज यांसारख्या प्रमुख क्लब्सचा समावेश होता.

या मैदानावर एकेकाळी एकावेळी २२ सामने खेळले जात असत. परंतु, मेट्रो प्रकल्प सुरू झाल्यानंतर त्याची क्षमता जवळपास निम्म्यावर आली होती. ज्या क्लब्सना खेळपट्ट्या परत मिळाल्या आहेत. त्यात आरबीआय, सेंट झेवियर्स, यंग फ्रेंड्स युनियन, यंग मुस्लिम, मुस्लिम युनायटेड, किला कोर्ट, बोहरा क्रिकेट क्लब आणि जॉन ब्राइट यांचा समावेश आहे. यापैकी काही क्लब्सना १०० हून अधिक वर्षांचा इतिहास आहे. आझाद मैदान हे खऱ्या अर्थाने मुंबई क्रिकेटचे उगमस्थान किंवा क्रिकेटपटूंच्या जडणघडणीचे केंद्र आहे. जागतिक स्तरावर नोंद घेतलेल्या हॅरिस आणि गाइल्स शील्ड या शालेय स्पर्धा, कांगा लीग आणि टाइम्स शील्ड यांसारख्या अनेक महत्त्वपूर्ण स्पर्धा या मैदानावर खेळवल्या जातात. विक्रमवीर सचिन तेंडुलकरपासून ते टी-ट्वेंटी वर्ल्डकप विजेता माजी कर्णधार रोहित शर्मा, माजी महान कर्णधार अजिंक्य रहाणे तसेच यशस्वी जैस्वाल, पृथ्वी शॉ आणि सर्फराज खान यांच्यासारखा मुंबईच्या अनेक दिग्गज फलंदाजांनी आझाद मैदानावरच आपल्या कौशल्याला पैलू पाडले आहेत.

आझाद मैदानावर क्लब्सना परत दिल्या जाणाऱ्या या आठ खेळपट्ट्यांचे नूतनीकरण मुंबई क्रिकेट असोसिएशनचे (एमसीए) अपेक्स कौन्सिलचे सदस्य आणि मैदान समन्वयक नदीम मेमन व प्रमोद यादव यांनी केले आहे. आझाद मैदानावर क्रिकेटचे पुनरागमन झाल्याचा मोठा आनंद आहे. सर्व मुंबईकर आणि क्रिकेटप्रेमींसाठी हा अभिमानाचा आणि भावूक क्षण आहे. मेट्रो रेल्वेच्या कामामुळे तब्बल ९ वर्षे बंद असलेली आझाद मैदानातील एमसीए संलग्न आठ क्लबसची क्रिकेट खेळपट्ट्या (पिचेस) आता पुन्हा एकदा खेळण्यायोग्य स्थितीत आल्या आहेत.

मुंबई क्रिकेटसाठी हे खरोखरच स्वप्न सत्यात उतरल्यासारखे आहे. मेट्रोचे काम पूर्ण झाल्यानंतर, क्रिकेट खेळपट्ट्या आणि आउटफील्ड पूर्ववत करणे व त्यांचा विकास करणे हे एक मोठे आव्हान होते. संपूर्ण मैदान राडारोडा आणि बांधकामाच्या साहित्याने व्यापलेले असल्याने हे काम अत्यंत कठीण झाले होते. एमसीएची मैदान समिती, ग्राऊंड स्टाफ आणि या प्रक्रियेत सहभागी असलेल्या सर्वांच्या कठोर परिश्रमांमुळे व सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे, खेळपट्ट्या आणि आउटफील्ड पुन्हा एकदा अशा दर्जाच्या बनल्या आहेत जिथे क्रिकेट खेळले जाऊ शकते, असे अनुभवी क्युरेटर नदीम मेमन यांनी सांगितले.

### एकावेळी २२ सामने खेळले जायचे

आझाद मैदानावर एकेकाळी एकाच वेळी २२ सामने खेळले जात असत. परंतु, मेट्रो प्रकल्प सुरू झाल्यानंतर त्याची क्षमता जवळपास निम्म्यावर आली होती. ज्या क्लब्सना खेळपट्ट्या परत मिळाल्या आहेत. त्यात आरबीआय, सेंट झेवियर्स, यंग फ्रेंड्स युनियन, यंग मुस्लिम, मुस्लिम युनायटेड, किला कोर्ट, बोहरा क्रिकेट क्लब आणि जॉन ब्राइट यांचा समावेश आहे. यापैकी काही क्लब्सना १०० हून अधिक वर्षांचा इतिहास आहे. क्रिकेटपटूंच्या पुढील पिढीला घडवण्यासाठी मैदानांवरील क्लब्सना (मैदान क्लब) उत्तम सुविधा आणि पाठिंबा देणे हे आमचे उद्दिष्ट आहे, असे मुंबई क्रिकेट असोसिएशनचे (एमसीए) अजिंक्य नाईक यांनी म्हटले आहे.

---

# ३ आयसीसी जेतेपदं, वर्ल्डकपविजेत्या कर्णधाराला डच्चू, शमीला संघाबाहेर ठेवण्याचा निर्णय

**महाईन्यूज । मुंबई**

**भारताचे माजी अष्टपैलू खेळाडू अजित आगरकर यांचा निवडसमिती प्रमुख म्हणून कार्यकाळ चांगलाच गाजला. या कार्यकाळात अनेक महत्त्वाच्या स्पर्धा झाल्या. अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले गेले. आगरकरांच्या कार्यकाळातील महत्त्वपूर्ण घटनांचा घेतलेला आढावा. कोणत्याही संघासाठी आयसीसी स्पर्धांचं जेतेपद हा मैलाचा दगड मानला जातो.**




भारतासाठी तिन्ही प्रकारात खेळलेल्या आगरकर यांच्या नेतृत्वातील निवडसमितीसाठी तीन वर्षांचा कालखंड सोनेरी यशाचा असंच म्हणावं लागेल. या काळात भारतीय संघाने २०२४ टी२० वर्ल्डकप, २०२५ चॅम्पियन्स ट्रॉफी आणि २०२६ मध्ये टी२० वर्ल्डकप अशा तीन स्पर्धांच्या जेतेपदावर नाव कोरलं. २०२४ मध्ये रोहित शर्माच्या सेनेने तब्बल १३ वर्षांनंतर विश्वविजेतेपदाला गवसणी घातली. राहुल द्रविड यांच्या मार्गदर्शनात भारतीय संघाने ऐतिहासिक यश मिळवलं. रोहित शर्मा आणि विराट कोहली या अनुभवी जोडगोळीने दमदार खेळी साकारत मोलाचा वाटा उचलला. सूर्यकुमारने यादवने फायनलच्या मुकाबल्यात घेतलेल्या झेलची अजूनही चर्चा होते. संघातल्या प्रत्येकाने या विजयात योगदान दिलं. या संघनिवडीसाठी आगरकर यांच्या निवडसमितीचं कौतुक झालं.

यशाची परंपरा कायम राखत आगरकर यांच्या निवडीसमितीने निवडलेल्या संघाने २०२५ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीच्या जेतेपदावर नाव कोरलं. २०१३ नंतर या स्पर्धेचं जेतेपद भारताने पटकावलं. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा पाकिस्तानात आयोजित करण्यात आली होती. मात्र भारतीय संघाचे सामने दुबईत झाले. याचा फायदा भारतीय संघाला झाला. सातत्यपूर्ण कामगिरीसह भारताने जेतेपदाची कमाई केली. घरच्या मैदानावर यजमान जिंकू शकत नाहीत हा गैरसमज मोडीत काढत सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात खेळणाऱ्या भारतीय संघाने इतिहास घडवला. महिनाभर चाललेल्या स्पर्धेत भारतीय संघाने फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा तिन्ही आघाड्यांवर दमदार कामगिरी करत यश मिळवलं. सूर्यकुमारच्या नेतृत्वात युवा संघ खेळत होता. मात्र त्यांनी दडपण न घेता खेळ केला. स्पर्धेसाठी योग्य संघ निवडल्याबद्दल निवडसमितीचं कौतुक झालं.

### सूर्याला संघातूनही डच्चू

वर्ल्डकपविजेता कर्णधार सूर्यकुमारला कर्णधारपदावरून बाजूला केल्यावर आगरकर यांच्या निवडसमितीने त्याला संघातूनही वगळलं. गेले दीड ते दोन वर्षात सूर्यकुमारची फलंदाज म्हणून कामगिरी लौकिकाला साजेशी झाली नव्हती. आयपीएल स्पर्धेतही सूर्यकुमारची बॅट तळपली नाही. सूर्यकुमारची फलंदाजी समाधानकारक नसली तरी त्याच्या नेतृत्वातच संघाने टी२० वर्ल्डकप जेतेपदावर नाव कोरलं. मात्र भारतीय संघात प्रवेशासाठी तीव्र चुरस लक्षात घेऊन निवडसमितीने सूर्याला संघातूनही वगळलं. वर्ल्डकप जिंकल्यानंतर पुढच्या मालिकेसाठी कर्णधार नाही, संघातही नाही असं दुर्दैव सूर्यकुमारच्या नशिबी आलं.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। शनिवार ।
दि. 19 सप्टेंबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# पिंपरी-चिंचवड महोत्सव २०२६ : सांस्कृतिक वैभवाचा उत्सव

## कला, साहित्य, संगीत आणि संस्कृतीचा त्रिदिवसीय सोहळा; १८ ते २० सप्टेंबरदरम्यान कार्यक्रम

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**कला, साहित्य, संगीत, संस्कृती आणि पिंपरी-चिंचवड शहराच्या समृद्ध परंपरेचा उत्सव साजरा करणाऱ्या 'पिंपरी-चिंचवड महोत्सव २०२६' संदर्भात आज महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधून महोत्सवाची रूपरेषा, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, कलाकारांचा सहभाग तसेच पुरस्कार सोहळ्याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.**



शहरातील कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, साहित्यिक व सांस्कृतिक चळवळीला नवी ऊर्जा मिळावी तसेच कला, साहित्य, क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक यांसह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या गुणवंतांचा गौरव व्हावा, हा या महोत्सवाच्या आयोजनामागील प्रमुख उद्देश आहे.

दि. १८ ते २० सप्टेंबर २०२६ या कालावधीत आयोजित या त्रिदिवसीय सांस्कृतिक पर्वात विविध कलाविष्कार, नामवंत कलाकारांचे कार्यक्रम, साहित्यिक उपक्रम, संगीत, लोककला तसेच विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा सन्मान अशा विविध कार्यक्रमांची मेजवानी नागरिकांना अनुभवता येणार आहे. पिंपरी-चिंचवड शहराची सांस्कृतिक अस्मिता, कलावैभव आणि सर्जनशीलता अधोरेखित करणारा हा महोत्सव ठरणार आहे.

शहरातील कलाकार, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्ते आणि गुणवंतांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच नागरिकांना दर्जेदार कलाविष्कारांचा अनुभव घेता यावा, या दृष्टीने महोत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे. शहरातील नागरिकांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने सहभागी होऊन या सांस्कृतिक पर्वाचा आनंद घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. पत्रकार परिषदेस आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे, उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, कला, क्रीडा, सांस्कृतिक व पर्यटन समितीचे सभापती कैलास कुटे आणि नगरसदस्य राहुल कलाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### शहराच्या सांस्कृतिक ओळखीला नवी उंची मिळेल

"पिंपरी-चिंचवड शहर हे केवळ औद्योगिक नगरी म्हणून नव्हे, तर कला, साहित्य, संगीत आणि संस्कृतीची समृद्ध परंपरा जपणारे शहर म्हणूनही आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत आहे. स्थानिक कलाकार, साहित्यिक आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे आणि नागरिकांना दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमांचा अनुभव घेता यावा, या उद्देशाने 'पिंपरी-चिंचवड महोत्सव २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागातून हा महोत्सव शहराच्या सांस्कृतिक वाटचालीतील संस्मरणीय पर्व ठरेल," असे स्वागताध्यक्ष तथा महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.

### स्थानिक प्रतिभेला व्यापक व्यासपीठ देणारा महोत्सव - आमदार अमित गोरखे

"पिंपरी-चिंचवडमध्ये कला, साहित्य, संगीत, नाट्य आणि लोककलेच्या क्षेत्रात मोठी प्रतिभा आहे. या प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि नवोदित कलाकारांना आपली कला सादर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी अशा महोत्सवांची आवश्यकता आहे. 'पिंपरी-चिंचवड महोत्सव २०२६'च्या माध्यमातून स्थानिक कलाकारांसोबत विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा गौरव होणार असून शहराच्या सांस्कृतिक चळवळीला अधिक बळ मिळेल," असे मुख्य संयोजक तथा आमदार अमित गोरखे यांनी सांगितले.

### सर्वांच्या सहभागातून शहराचा सांस्कृतिक उत्सव साकारतोय

"कला आणि संस्कृती ही शहराच्या सामाजिक जीवनाला समृद्ध करणारी महत्त्वाची शक्ती आहे. पिंपरी-चिंचवडमधील विविध सांस्कृतिक प्रवाह, परंपरा आणि कलागुणांना एकाच व्यासपीठावर आणण्याचा प्रयत्न या महोत्सवातून होत आहे. सर्व घटकांच्या सहभागातून साकारत असलेला हा महोत्सव शहरातील सांस्कृतिक वातावरण अधिक समृद्ध करेल. नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभागी होऊन या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा," असे मुख्य संयोजक तथा विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले.

# पंतप्रधान आवास योजनेतील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**चऱ्होली येथील पंतप्रधान आवास योजनेतील रहिवाशांच्या विविध प्रलंबित मागण्या व मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न मार्गी लावण्यासाठी महापालिका प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पंतप्रधान आवास योजना विभागाचे प्रमुख श्री. बन्सल यांच्यासोबत सविस्तर बैठक घेऊन प्रलंबित कामांबाबत चर्चा करण्यात आली.**



पंतप्रधान आवास योजनेतील रहिवाशांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, प्रलंबित विकासकामे तसेच आवश्यक मूलभूत सुविधांबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. महापालिकेची टेंडर प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून पंतप्रधान आवास योजनेतील प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन श्री. बन्सल यांनी दिले.

दरम्यान, गृहप्रकल्पातील नागरिकांच्या पाणीपुरवठ्याच्या समस्येबाबत महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. भोसले यांच्यासोबतही चर्चा करण्यात आली. सद्यस्थितीत परिसरातील पाणीपुरवठा, पाण्याचा दाब आणि उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे प्रमाण याबाबत प्रत्यक्ष परिस्थिती तपासण्यासाठी पुढील चार ते पाच दिवस पाणीपुरवठ्याचे रीडिंग घेण्यात येणार आहे. या पाहणीत पाण्याचा दाब किंवा पाणीपुरवठा कमी असल्याचे निदर्शनास आल्यास त्या ठिकाणी नवीन पाणीपुरवठा लाईन टाकून नागरिकांचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे कार्यकारी अभियंता श्री. भोसले यांनी सांगितले.

पंतप्रधान आवास योजनेतील नागरिकांना दर्जेदार मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, तसेच प्रलंबित कामांना गती मिळावी, यासाठी संबंधित महापालिका विभागांशी सातत्याने समन्वय साधून पाठपुरावा सुरू आहे. नागरिकांच्या न्याय्य मागण्या प्रशासनापर्यंत पोहोचवून त्या मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील, अशी भूमिका यावेळी व्यक्त करण्यात आली पाणीपुरवठा, प्रलंबित विकासकामे आणि इतर मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न लवकरात लवकर सुटल्यास पंतप्रधान आवास योजनेतील रहिवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानुसार संबंधित कामांना गती देऊन नागरिकांच्या समस्या प्रत्यक्षात सोडवाव्यात, अशी अपेक्षा रहिवाशांकडून व्यक्त होत आहे.

"चऱ्होली येथील पंतप्रधान आवास योजनेतील गृहप्रकल्पाचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे. या गृहप्रकल्पातील अनेक सदनिकांमध्ये गळतीची समस्या असून, बांधकामाच्या दर्जाबाबतही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. तसेच नागरिकांना आश्वासन देण्यात आलेल्या अमेनिटी व इतर आवश्यक सोयी-सुविधा अद्याप पूर्णपणे उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. विशेष म्हणजे, या गृहप्रकल्पातील रहिवाशांना पाण्यासारखी मूलभूत सुविधा देण्यातही महापालिका प्रशासन अपयशी ठरत आहे, ही अत्यंत खेदाची बाब आहे. महापालिकेने या गृहप्रकल्पातील सर्व प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून रहिवाशांना आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. प्रशासनाकडून या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष दिले गेले नाही आणि कामे पूर्ण करण्यात आली नाहीत, तर पंतप्रधान आवास योजनेतील सर्व सभासदांना सोबत घेऊन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेसमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल."

**- संजीवन सांगळे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशन.**

# वाचनाच्या ज्ञानदीपाने उजळला गणेशोत्सव!

## मोशीतील गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलचा ‘ग्रंथसंपदा’ उपक्रम

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**गणेशोत्सवाच्या पारंपरिक भक्तीला ज्ञान, संस्कार आणि वाचनसंस्कृतीची जोड देत मोशी येथील गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये यंदाचा गणेशोत्सव ‘ग्रंथसंपदा’ या आगळ्यावेगळ्या आणि ज्ञानवर्धक संकल्पनेवर उत्साहात साजरा करण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून शाळेने विद्यार्थी, पालक आणि समाजापुढे एक प्रेरणादायी सामाजिक संदेश ठेवला आहे.**



स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. विनायक भोंगाळे यांनी या प्रसंगी सांगितले की, “‘ग्रंथसंपदा’ ही केवळ पुस्तकांची संग्रहित संपत्ती नसून समाजाच्या बौद्धिक, सांस्कृतिक आणि नैतिक विकासाचा अमूल्य ठेवा आहे. पुस्तके माणसाला विचार करायला शिकवतात, ज्ञानाची क्षितिजे विस्तारतात आणि जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात.” याच विचारांना केंद्रस्थानी ठेवून गणेशोत्सवाची विशेष सजावट आणि मांडणी करण्यात आली आहे.

गणपती बाप्पाला बुद्धी आणि ज्ञानाचे प्रतीक मानले जाते. याच भावनेतून ‘वाचाल तर वाचाल, वाचनातून घडाल आणि ज्ञानातून समाज घडवाल’ हा संदेश देत भक्ती आणि ज्ञानाचा सुंदर संगम या ठिकाणी साधण्यात आला आहे.

या ज्ञानमय सोहळ्यास संस्थेचे अध्यक्ष श्री. विनायक भोंगाळे, नगरसेविका कविताताई भोंगाळे पाटील, खजिनदार सौ. विजया भोंगाळे, विश्वस्त सौ. सरिता विखे पाटील, योगेश एंटरप्राइजेसचे व्यवस्थापकीय संचालक श्री. योगेश भोंगाळे, विपणन अधिकारी श्री. शैलेंद्र सिंग, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच सर्व पालक प्रतिनिधी आणि पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित सर्व मान्यवरांनी आणि पालकांनी गणरायाच्या भक्तीसोबतच वाचनसंस्कृती जपणाऱ्या या सामाजिक व शैक्षणिक उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. ज्ञान, भक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा हा मिलाफ उपस्थितांच्या मनात घर करून गेला आहे.

# दापोडी परिसरामध्ये नाले सफाई मोहीम; नगरसेविका स्वाती माई काटे यांचा पुढाकार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**दापोडीतील प्रभाग क्रमांक ३० मधील रेल्वे लाईनजवळील सिद्धार्थनगर परिसरातील मोठ्या नाल्यात मोठ्या प्रमाणात साचलेली घाण, कचरा आणि गाळ यामुळे परिसरात दुर्गंधी तसेच अस्वच्छतेचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर स्थानिक नगरसेविका स्वाती माई काटे यांच्या पुढाकाराने नाल्याची व्यापक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.**





### नगरसेविकांची प्रतिक्रिया

“नागरिकांना स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरण मिळणे ही प्राथमिक जबाबदारी आहे. प्रभागातील स्वच्छतेशी संबंधित समस्या निदर्शनास येताच त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला जात आहे,” अशी भूमिका नगरसेविका सौ. स्वाती माई काटे यांनी व्यक्त केली.

### नाल्यातील कचरा, गाळ काढण्याची मोहीम

सिद्धार्थनगर परिसरातील या नाल्यात अनेक दिवसांपासून कचरा व घाण साचल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. पावसाळ्यात नाल्यातील पाण्याचा प्रवाह सुरळीत राहण्यासाठी तसेच परिसरात साचण्याची शक्यता कमी करण्यासाठी नाल्यातील कचरा, घाण आणि गाळ काढण्याचे काम हाती घेण्यात आले. नगरसेविका स्वाती माई काटे यांच्या पुढाकारातून संबंधित कर्मचाऱ्यांनी नाल्यात उतरून साचलेला कचरा बाहेर काढला. त्यानंतर परिसराची साफसफाई करून औषध फवारणी करण्यात आली, त्यामुळे नाल्याची स्वच्छता होण्याबरोबरच डासांचा प्रादुर्भाव आणि दुर्गंधी कमी होण्यास मदत होणार आहे.

### नागरिकांकडून समाधान व्यक्त

सिद्धार्थनगरमधील नागरिकांच्या दैनंदिन आरोग्याशी संबंधित समस्या लक्षात घेऊन ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले. परिसरातील नाले, गटारे आणि सार्वजनिक ठिकाणांची नियमित स्वच्छता करण्याची मागणीही नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# गणेशम-२ सोसायटीतील आगीत नाना काटेंची तत्परता

## दोन चिमुरड्यांची सुखरूप सुटका; फ्लॅटमध्ये फ्रिजचा स्फोट होऊन भीषण आग लागली

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपळे सौदागर परिसरातील गणेशम-२ सोसायटीमधील आय-३०४ क्रमांकाच्या फ्लॅटमध्ये फ्रिजचा स्फोट होऊन भीषण आग लागल्याची घटना घडली. या दुर्घटनेची माहिती मिळताच माजी विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी कोणताही विलंब न करता तातडीने अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून अग्निशमन गाड्या घटनास्थळी रवाना करण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली. त्यानंतर नाना काटे स्वतः घटनास्थळी दाखल होत परिस्थितीची पाहणी केली.**





प्राथमिक माहितीनुसार, अनंतवार कुटुंबीयांच्या फ्लॅटमध्ये फ्रिजचा स्फोट झाल्यानंतर अचानक आग भडकली. आगीची तीव्रता लक्षात घेता सोसायटीतील नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. विशेषतः फ्लॅटमध्ये दोन मुली अडकून पडल्याची माहिती समोर आल्यानंतर परिस्थिती अधिक गंभीर बनली.

नाना काटे यांनी घटनास्थळी पोहोचल्यानंतर अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून घटनेची माहिती घेतली. आग नियंत्रणात आणण्यासाठी तसेच सोसायटीतील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

दरम्यान, एका युवकाने तसेच अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत फ्लॅटमध्ये अडकलेल्या दोन्ही मुलींना सुखरूप बाहेर काढले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. आगीतून बाहेर काढल्यानंतर दोन्ही मुलींना प्राथमिक उपचारासाठी जवळच्या जीवन ज्योती रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर प्राथमिक उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच तातडीने अग्निशमन विभागाशी संपर्क साधणे, घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचा आढावा घेणे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक सूचना देणे, यामुळे नाना काटे यांनी प्रसंगावधान दाखवले. तसेच अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांसह संबंधित युवकाने दाखवलेल्या तत्परतेमुळे दोन मुलींची सुखरूप सुटका होऊ शकली.

या घटनेनंतर सोसायटी परिसरात सुरक्षेच्या उपाययोजनांबाबतही चर्चा सुरू झाली असून, घरगुती विद्युत उपकरणे, फ्रिज आणि इतर उपकरणांची नियमित तपासणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# Physical Education:- An Essential Part of School Life



**In school, we often measure a student's success through marks, grades and academic performance. But true education is much bigger than that. A student also needs a healthy body, an active mind and the confidence to face challenges. This is where Physical Education becomes an essential part of school life.**

Physical Education gives students the chance to move, play, learn and grow. It is not simply about running on a field or playing a game. It teaches students how to take care of their body and understand the value of fitness in everyday life. Regular physical activity can improve strength, stamina, coordination and overall fitness.

Sports also teach lessons that cannot always be learned inside a classroom. A football match can teach teamwork, a difficult practice can teach discipline, and losing a game can teach students how to accept failure and come back stronger. These experiences slowly build confidence, responsibility and a positive attitude.

For today's students, the need for physical activity is even greater. With increasing screen time and less outdoor play, schools have an important role in making sure children remain active. Every student should get the opportunity to participate in sports and physical activities, whether they are a competitive player or simply enjoy playing.




Physical activity also has a strong connection with learning. When students are active, they feel more energetic and refreshed. Regular exercise can help them stay focused, manage stress and maintain a better balance between studies and daily life.

As educators, our responsibility is not only to prepare students for examinations but also to prepare them for life. Physical Education helps us do exactly that. It develops the body, strengthens the mind and teaches values that stay with students beyond their school years

Physical Education is not an extra activity in school. It is a part of complete education. When we help children become fit, active and confident today, we are helping build a healthier generation for tomorrow.

A healthy body and a healthy mind together create a successful student. Physical Education is not just a school subject. It is an important part of preparing students for a healthy and active life.

**BASIT FAROOQ PARRY**
**SPORTS TEACHER**
**PRIYADARSHANI SCHOOL,MOSHI**

# पिंपरी-चिंचवडचा ४४ वा वर्धापन दिनी विविध उपक्रम

## विकासप्रवासाचा आढावा, अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या योगदानाचा गौरव; विविध उपक्रमांचे आयोजन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा ४४ वा वर्धापन दिन विविध सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा तसेच अधिकारी-कर्मचारी केंद्रित उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या विकासात्मक वाटचालीचा आढावा घेणे, शहराच्या विकासात योगदान देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करणे तसेच नागरिकाभिमुख प्रशासन अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. महापौर रवि लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धापन दिनाच्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यात येत आहे.**




महानगरपालिकेचा वर्धापन दिन दरवर्षी ११ ऑक्टोबर रोजी साजरा करण्यात येतो. यंदा ११ ऑक्टोबर रोजी रविवार व साप्ताहिक सुट्टी असल्यामुळे मुख्य वर्धापन दिन कार्यक्रम सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे. महानगरपालिका मुख्य प्रशासकीय इमारत, पिंपरी तसेच प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन प्रस्तावित आहे.

वर्धापन दिनाच्या पूर्वतयारी व नियोजनासंदर्भात महापौर रवि लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेण्यात आली. बैठकीस सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, कला, क्रीडा, सांस्कृतिक व पर्यटन समितीचे सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, प्रभाग अध्यक्ष निखील बो-हाडे, नगरसदस्य राजू मिसाळ, विकास साने, निलेश तरस, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच शशिकांत झिंजुर्डे, उमेश बांदल, मंगेश कलापुरे, चंद्रशेखर गावडे, नितीन समगीर, लाला गाडे, विश्वनाथ लांडगे, राजाराम लांडे, मदन चिंचवडे, किशोर आठवाल, अनिल लखन आणि राकेश चव्हाण आदी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड शहराच्या गेल्या ४४ वर्षांच्या विकासामध्ये महानगरपालिकेची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. औद्योगिक नगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराचा आधुनिक व विकसित शहराच्या दिशेने झालेला प्रवास हा नागरिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सामूहिक सहभागातून साध्य झाला आहे. या विकासप्रवासाचा आढावा घेण्यासोबतच आगामी काळातील शहराच्या गरजा लक्षात घेऊन नागरिककेंद्रित, पारदर्शक, गतिमान आणि गुणवत्तापूर्ण प्रशासन अधिक सक्षम करण्याचा संकल्प वर्धापन दिनाच्या निमित्ताने करण्यात येणार आहे. महापौर रवि लांडगे म्हणाले, “पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा ४४ वा वर्धापन दिन हा शहराच्या विकासात्मक वाटचालीचा आढावा घेण्याबरोबरच या प्रवासात योगदान देणाऱ्या प्रत्येक घटकाच्या कार्याची दखल घेण्याचा महत्त्वपूर्ण प्रसंग आहे. नागरिकांचा सहभाग, लोकप्रतिनिधींचे सहकार्य आणि महानगरपालिकेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नातून शहराच्या विकासाला सातत्याने गती मिळाली आहे. आगामी काळात शहराच्या वाढत्या गरजा आणि नागरिकांच्या अपेक्षा लक्षात घेऊन अधिक सक्षम, गतिमान, पारदर्शक व नागरिकाभिमुख प्रशासन देण्यास प्राधान्य राहील. वर्धापन दिनाच्या निमित्ताने अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या योगदानाचा गौरव करण्यासोबतच विविध सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांमधून त्यांचा सहभाग वाढविण्यात येणार आहे.”

वर्धापन दिनानिमित्त नगरीचे शिल्पकार अण्णासाहेब मगर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. यासोबत रक्तदान शिबिर, महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी विशेष उपक्रम, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी चहापान व अल्पोपहार, कर्मचारी ऑर्केस्ट्रा, गुणवंत अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार तसेच विविध स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव आदी कार्यक्रमांचे आयोजन प्रस्तावित आहे.

महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी पाककला व रांगोळी स्पर्धांसह विविध सांस्कृतिक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच संगीत खुर्ची, रस्सीखेच व अन्य क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे.

### ४४वा वर्धापन दिन उत्साहात होणार

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या ४४ व्या वर्धापन दिनानिमित्त उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. वर्धापन दिनाच्या कार्यक्रमांसाठी विविध विभागांना जबाबदाऱ्या सोपवून नियोजनबद्ध तयारी करण्यात येणार आहे. वर्षभरातील विकासकामे, प्रकल्प व नागरिकाभिमुख उपक्रमांची माहिती सोशल मीडिया आणि व्हीएमडीच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिरासह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, मान्यवरांचे पुस्तकांच्या प्रती देऊन स्वागत केले जाणार आहे.

# गणेशम फेज-२ सोसायटीत आग; दोन चिमुरड्यांची सुखरूप सुटका

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील गणेशम फेज-२ सोसायटीमध्ये अचानक आग लागल्याची थरारक घटना शुक्रवारी घडली. आगीचे वृत्त समजताच नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत अग्निशमन दलाला पाचारण केले. दरम्यान, आगीच्या भक्ष्यस्थानी सापडलेल्या एका खोलीत दोन लहान चिमुरडी अडकून पडल्याचे निदर्शनास आले.**





अग्निशमन दलाच्या जवानांनी प्रसंगावधान राखत तातडीने बचावकार्य सुरू करून दोन्ही मुलींची सुखरूप सुटका केली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. आगीची माहिती मिळताच नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी तत्काळ संबंधित यंत्रणेशी संपर्क साधून अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल होण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली. काही वेळातच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. आगीच्या ठिकाणी दोन लहान मुले अडकल्याचे समजताच जवानांनी कोणतीही भीती न बाळगता तातडीने बचावकार्य हाती घेतले आणि दोन्ही चिमुरड्यांना सुरक्षितपणे बाहेर काढले. या घटनेवेळी नगरसेविका अनिताताई काटे आणि नगरसेविका कुंदाताई भिसे देखील घटनास्थळी उपस्थित होत्या. त्यांनीही परिस्थितीची पाहणी करून संबंधित यंत्रणेशी समन्वय साधत बचावकार्याची माहिती घेतली.

दरम्यान, अग्निशमन दलाच्या जवानांकडून आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू होते. आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, संबंधित यंत्रणेकडून त्याबाबतची माहिती घेतली जात आहे. नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी दाखवलेली तत्परता आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी दाखवलेले धाडस व वेगवान बचावकार्य यामुळे मोठा अनर्थ टळला. विशेषतः आगीच्या ठिकाणी अडकलेल्या दोन चिमुरड्यांची सुखरूप सुटका झाल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.